दिनांक 12/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 38

विषय – विटा शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित सुधारित पाणी पुरवठा योजना मंजूर होणे अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) महाभियान अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या प्रस्तावित सुधारित पाणीपुरवठा योजनेसाठी पाणी आरक्षण मिळणेबाबत टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी यांचेकडे प्रस्ताव दाखल करणे कामी विचार विनिमय करून निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी अभियंता,पाणी पुरवठा विभाग यांची दिनांक 12/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) मा.कार्यकारी अभियंता, टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी यांचेकडील पत्र क्र.जा.क्र.टेंउसिंप्रव्यवि/प्रशा-4/2597/ 2024 दि.07/08/2024

विटा नगरपरिषदेकडील प्रशासकीय ठराव क्र.229 दि.25/01/2024 अन्वये, विटा नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) महाभियान अंतर्गत विटा नगरपरिषदेची सुधारित पाणीपुरवठा योजना प्रस्तावित केलेली आहे. सदर ठरावाद्वारे दिलेल्या मान्यतेनुसार नगरपरिषदेने सुधारित पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करून तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांचेकडे सादर केला होता. मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे प्रादेशिक विभाग, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. मु.अ.(पुणे)/ तांशा3/ नगरोत्थान/ विटापापुयो/ 44/2023 दि.05.01.2024 च्या पत्रान्वये सदर प्रस्तावास तांत्रिक मंजूरी प्रदान केली आहे.

मा. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी येथील दि.15.01.2024 च्या पत्रान्वये, विटा नगरपरिषदेचा सुधारित पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या मंजुरीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांचेकडे सादर केला होता, परंतु सदर प्रस्तावासोबत पाणी आरक्षण जोडलेले नाही. पाणीपुरवठा योजनेच्या तांत्रिक मंजुरीनुसार संकल्पित केलेप्रमाणे योजनेच्या अंतिम टप्याकरिता पाणी आरक्षणाची मागणी नगरपरिषदेच्या स्तरावरुन करणे गरजेचे आहे.

पान नं.2 वर

त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) महाभियान अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या प्रस्तावित सुधारित पाणीपुरवठा योजनेसाठी वरीलप्रमाणे पाणी आरक्षण आवश्यक असून, नवीन योजनेद्वारे प्रति मानसी मूळ रहिवाशी लोकसंख्येस 135 लि. प्रती दिवस व तरंगत्या लोकसंख्येस 45 लि. प्रती दिवस इतका पाणी पुरवठा करण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेला वाझर हा पाण्याचा स्त्रोत ग्राह्य धरलेला आहे. विटा शहरासाठी 2051 सालापर्यंत 2.2207 द.ल.घ.मी इतक्या पाणी आरक्षणाची गरज आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत विटा नगरपरिषदे करिता सन 2051 साला पर्यन्त आवश्यक पाणी 2.2207 द.ल.घ.मी इतके पाणी आरक्षण मिळणेकामीचा प्रस्ताव टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

सदर पाणी आरक्षण प्रस्ताव मंजुरी नंतर आवश्यक तो करारनामा व शासकीय नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र. 71/नवि-14, दि.27 डिसेंबर 2021 व महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील कलम 317 (3) अन्वये तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली नगरपालिका प्रशासन शाखा पत्र क्र.नवि/कार्या-2/कावि-10/2024 दिनांक 15.01.2024 अन्वये विटा शहरातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित सुधारित पाणी पुरवठा योजना मंजूर होणे अतिशय महत्वाची आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) महाभियान अंतर्गत विटा नगरपरिषदेच्या प्रस्तावित सुधारित पाणीपुरवठा योजनेसाठी पाणी आरक्षण मिळणेबाबत टेंभू उपसा सिंचन प्रकल्प व्यवस्थापन विभाग, ओगलेवाडी यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 12/08/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 39

विषय – विटा शहरातील ट्राफिक सिग्नल दुरुस्ती करून घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 12/08/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा शहरातील मुख्य चौक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातील ट्राफिक सिग्नल हा नादुरुस्त असल्यामुळे बंद पडलेला आहे. सदरील ट्राफिक सिग्नल बंद असलेमुळे वाहतुकीची कोंडी होत असलेबाबत व बंद असलेला सिग्नल तात्काळ सुरु करणेबाबत शहरातील नागरिकांकडून वारंवार मागणी होत आहे.

तरी विटा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील ट्राफिक सिग्नल हा दुरुस्त करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा